# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु., इगतपुरी,
## विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com

**६५) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १४.११.२०२५**

**जिल्हा : नाशिक**

| मागील आठवड्यातील हवामान (०८/११/२०२५ ते १४/११/२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (१५/११/२०२५ ते १९/११/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०८ | ०९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | दिनांक | १५ | १६ | १७ | १८ | १९ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३०.० | २७.८ | २८.५ | २८.२ | २८.५ | २७.८ | २८.० | कमाल तापमान (अं.से.) | ३० | २९ | २८ | २८ | २९ |
| १६.० | १५.१ | १३.३ | १३.३ | १३.१ | १३.६ | १४.० | किमान तापमान (अं.से.) | ११ | १० | ९ | ९ | ११ |
| अ:ढगाळ | अ:ढगाळ | निरभ्र | अ:ढगाळ | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | ढग स्थिती (आकाश) | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र |
| ७६ | ७१ | ६८ | ७१ | ७६ | ७१ | ५७ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ६८ | ६५ | ६३ | ६४ | ६३ |
| ४६ | ४१ | ४३ | ४१ | ४३ | ४० | ४१ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ४२ | ४० | ४१ | ३९ | ३६ |
| ३.५ | ४.४ | २.६ | ३.० | २.४ | ४.० | ५.५ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ७.१ | ७.१ | ७.२ | ६.९ | ७.४ |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश** | | पुढील पाच दिवसाचा अंदाज लक्ष्यात घेता नाशिक जिल्ह्यात हवामान थंड व कोरडे राहिल. आकाश पुढील पाच दिवस निरभ्र राहील. तसेच कमाल तापमान २८-३० डिग्री सें. व किमान तापमान ९-११ डिग्री सें. दरम्यान राहण्याची शक्यता आहे. तसेच वा-याचा वेग ६-७ कि. मी/तास या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| **हवामान सतर्कता / इशारा:** | | **कृषी क्षेत्रावरील प्रभाव आधारित अंदाज (IBF) आणि इशारा लक्षात दि. १६ व १७ नोव्हेंबर २०२५ रोजी नाशिक जिल्ह्यात तुरळक ठिकाणी (येलो अलर्ट) थंडीच्या लाटेची शक्यता आहे. (१४.११.२०२५ रोजी आरएमसी मुंबईद्वारे जारी केलेल्या जिल्हास्तरीय अंदाज आणि चेतावणीवर आधारित).** |
| **सामान्य सल्ला** | | वेल वर्गीय पिके<br>अपेक्षित फळधारणेतील समस्या व उपाय<br>वेलवर्गीय भाजीपाला पिकांमध्ये फुलांची निर्मिती आणि अपेक्षित फळधारणेमध्ये येणाऱ्या समस्यांसाठी प्रतिकूल वातावरण, लागवडीची अयोग्य वेळ व जातीची निवड, असंतुलित खतमात्रा, अयोग्य सिंचन व्यवस्थापन, परागीभवनातील समस्या, कीड-रोगांचा प्रादुर्भाव, अतिरिक्त शाकीय वाढ इत्यादी कारणे आहेत.<br>व्यवस्थापन<br>वेलवर्गीय भाजीपाला पिकांच्या लागवडीचा योग्य हंगाम साधावा व कालावधीनुसार योग्य जातीची निवड करावी.<br>अन्नद्रव्यांची कमतरता किंवा असमतोल; तसेच अयोग्य वेळी वापर केल्यास फुलांची निर्मिती, फळधारणा कमी होते. म्हणून माती परीक्षणानुसार पिकास मुख्य व सूक्ष्म अन्नद्रव्यांचा योग्य अवस्थेला संतुलित मात्रेत वापर करावा.<br>पिकवाढीच्या अवस्थेनुसार आवश्यकतेप्रमाणे सिंचन करावे. जमीन कायम वाफसा स्थितीत राहील तसेच शेतात अतिरिक्त पाणी साचणार नाही, याची दक्षता घ्यावी. प्राधान्याने ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करणे फायद्याचे ठरते.<br>परपरागीभवनासाठी मधमाशा, उपयुक्त कीटक मदत करतात. त्यामुळे भाजीपाला लागवड क्षेत्रात किंवा सभोवती मधमाशीपालन किंवा मधमाशांचे संवर्धन करावे. पीक फुलधारणा अवस्थेत आल्यानंतर कीडनाशकांचा वापर टाळावा. ते शक्य नसल्यास मधमाशा किंवा मित्रकीटक यांना हानिकारक असणारी कीडनाशके वापरण्याचे टाळावे किंवा जैविक कीडनाशके वापरावीत.<br>फळांची काढणी योग्य पक्वतेस करावी, जेणेकरून नवीन फुलांच्या निर्मितीसाठी व उपलब्ध फुलांच्या योग्य वाढीसाठी मदत मिळेल.<br>लक्षणे व प्रादुर्भावाची पातळी यानुसार वेळीच कीड व रोग नियंत्रणासाठी उपाययोजना कराव्यात.<br>मादी फुलांचे प्रमाण वाढविण्यासाठी तसेच फुलगळ, फळगळ रोखण्यासाठी शिफारशीत संजीवकांचा योग्य त्या मात्रेमध्ये वापर करावा. |
| **संदेश** | | **हवामानाचा अंदाज आणि इशारा लक्षात घेता थंडीपासून रब्बी पिकांचे संरक्षण करण्यासाठी संध्याकाळच्या वेळी हलके व वारंवार पाणी / तुषार सिंचन च्या सहाय्याने द्यावे.** |
| **रब्बी ज्वारी** | **पेरणी / आंतरमशागत** | पेरणीनंतर १५ दिवसांनी विरळणी करून एका ठिकाणी एक रोप ठेवावे व पेरणीनंतर ३ आठवड्यांने फटीच्या कोळप्याने पहिली कोळपणी करावी.<br>दुसऱ्या पंधरवड्यात खोडकिडाचा प्रादुर्भाव दिसल्यास क्विनालफॉस २५ ईसी ७५० मिली प्रवाही ५०० लीटर पाणी हेक्टरी फवारणी करावी. आवश्यकतेनुसार पहिली खुरपणी करावी. पेरणीनंतर ८ आठवड्याने दातेरे कोळप्याने दुसरी कोळपणी करावी आणि गरज असल्यास पहिले संरक्षित पाणी द्यावे. |

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com


| | | |
|---|---|---|
| **रब्बी मका** | **पेरणी** | पाण्याची उपलब्धता असल्यावरच रब्बी मका पिकाची पेरणी करावी. रब्बी हंगामात मका पेरणी १५ नोव्हेंबर पर्यंत पूर्ण करावी. पेरणीसाठी एकरी ६ ते ८ किलो बियाणे लागते. पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास थायरम हे बुरशीनाशक २.५ ग्रॅम आणि सायअॅन्ट्रानिलीप्रोल (१९.८%) + थायमिथोक्झाम (१९.८% एफएस) हे संयुक्त कीटकनाशक ६ मिली या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी. रासायनिक बीजप्रकियेनंतर, अॅझोटोबॅक्टर आणि स्फुरद विरघळविणारे जीवाणू संवर्धक प्रत्येकी २५ ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी.<br>रब्बी हंगामात सरी-वरंबा पद्धतीचा अवलंब करावा. उशिरा व मध्यम कालावधीच्या जातींसाठी ७५ x २० सें.मी. तर लवकर पक्व होणाऱ्या जातींसाठी ६० x २० सें.मी. अंतरावर सरीच्या बगलेत मध्यावर एका बाजूला टोकण पद्धतीने ४ ते ५ सें.मी. खोलीवर पेरणी करावी. |
| **गहू** | **पेरणी** | गव्हाची बागायती वेळेवर पेरणी नोव्हेंबरच्या पहिल्या पंधरवड्यात करावी. वेळेवर पेरणीसाठी फुले समाधान, त्र्यंबक, तपोवन, फुले सात्विक, एम.ए.सी.एस ६२२२, एम.ए.सी.एस ६४७८, डी.बी.डब्लू.१६८ या सुधारित वाणांचा वापर करावा. पेरणीसाठी प्रती हेक्टर १०० किलो बियाण्यांचा वापर करावा.<br>पेरणीपूर्वी बियाण्यास थायरम (७५% डब्लू. एस. ) ३ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास प्रक्रिया करावी. बियाणे वाळवल्यानंतर प्रति किलो बियाण्यास २५ ग्रॅम अझोटोबॅक्टर आणि २५ ग्रॅम स्फुरद विरघळ विणाऱ्या जीवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया करावी. बियाण्यास गुळाच्या थंड पाण्यात मिसळून चोळावे. असे बीजप्रक्रिया केलेले बियाणे तासभर सावलीत सुकवावे आणि मग पेरणी करावी. बीजप्रक्रियेमुळे उत्पादनात १० ते १५ टक्के वाढ होते.<br>तसेच मावा किडीचा नियंत्रणासाठी थायोमिथोक्झाम ३० एफ.एस. ७.५ मिली प्रति १० किलो बियाणे प्रमाणे बीजप्रक्रिया करावी.<br>पेरणीच्या वेळी जमिनीत पुरेशी ओल असावी. पेरणी ५ ते ६ सेंमी खोल करावी. त्यामुळे उगवण चांगली होते. बागायती वेळेवर गव्हाची पेरणी करतांना दोन ओळीत २० सेंमी अंतर ठेवून करावी. पेरणी उभी आडवी अशी दोन्ही बाजूने न करता एकेरी करावी म्हणजे आंतरमशागत करता येते. बियाणे झाकण्यासाठी कुळव उलटा करून चालवावा म्हणजे बी व्यवस्थित दबून झाकले जाते.<br>बागायती वेळेवर पेरलेल्या गहू पिकास पेरताना प्रती हेक्टरी ६० किलो नत्र, ६० किलो स्फुरद आणि ४० किलो पालाश द्यावे. |
| **हरभरा** | **आंतरमशागत** | पेरणीनंतर २० दिवसांनी पहिली व ३० दिवसांनी दुसरी कोळपणी करावी.<br>कोळपणीनंतर दोन रोपातील तण काढण्यासाठी खुरपणी करावी. |
| **खरीप भात** | **परिपक्वता अवस्था / कापणी** | भाताच्या काही जाती पक्व झाल्या तरी हिरव्या दिसतात. म्हणून कापणीस उशीर करू नये. त्यामुळे दाणे खडतात तसेच भरडताना कणी जास्त होते.<br>वेळेवर लागवड केलेल्या भात पीकात काढणीपूर्वी १० दिवस अगोदर पाण्याचा निचरा करावा.<br>पीक निसवल्यावरसाधारणपणे २५ ते ३० दिवसांनी ओंबीतील ८० ते ९०% दाणे पक्व झाल्यावर भाताची कापणी करावी. वैभव विळ्याचा वापर यासाठी करावा. यामुळे खोड्कीडीचे नियंत्रण होते. |
| **खरीप नाचणी व वरई** | **परिपक्वता अवस्था / कापणी** | पक्व नाचणी पिक पावसामुळे शेतात पडलेले असल्यास तयार नाचणी लोंब्या गोळा कराव्यात. गोळा केलेल्या लोंब्या सुरक्षित शेडमध्ये अथवा उन्हामध्ये सुकवाव्यात व त्यानंतर मळणी करून तयार शेतीमाल कोरड्या व सुरक्षित ठिकाणी ठेवावा. |
| **खुरासणी** | **दाणे भरणेची अवस्था / परिपक्वता अवस्था** | खुरासणी पीक १०० ते ११० दिवसात कापणीस तयार होते. बोंडाचा वरील भाग काळा पडल्यावर काढणीस तयार झाल्याचे समजावे. पीक पक्व झाल्यावर बोंडातील दाणे मोकळे होतात. पिकाची काढणी योग्य वेळी करणे अतिशय महत्वाचे आहे. |
| **बाजरी** | **मळणी / साठवणूक** | कापून ठेवलेली कणसे वाळवून मळणी करावी.<br>खरीप बाजरा पिकाची मळणी यंत्राच्या सहय्याने लवकरात लवकर करावी व धान्य उन्हात वाळवून सुरक्षित जागेवर साठवणूक करावी. |
| **मका** | **मळणी / साठवणूक** | खुडलेली मक्याची कणसे दोन ते तीन दिवस उन्हात चांगली वाळवावीत. त्यानंतर कणसाच्या वरील आवरण काढून मका सोलणी यंत्राच्या (म.फु.कृ.वि. राहुरीद्वारे विकसित सुधारित अवजार) साह्याने कणसातील दाणे वेगळे करावेत. दाण्यांतील पांढरी तुसे, बिट्ट्याचे तुकडे वेगळे करण्यासाठी उफणणी करावी. दाणे चांगले उन्हात वाळवून दाण्यांतील आर्द्रता १२ टक्क्यांपर्यंत ठेऊन साठवण करावी. |
| **सोयाबीन** | **मळणी** | मळणी करताना मळणी मशीनच्या शाफ्टची गती ३०० ते ४०० आरपीएम असावी. म्हणजे सोयाबीनच्या उगवणक्षमतेवर अनिष्ट परिणाम होणार नाही. |
| **भुईमुग** | **मळणी / साठवणूक** | भुईमुग पिकाच्या शेंगा तोडणी साठी भुईमुग शेंगा तोडणी चौकट व शेंगा फोडणी साठी भुईमुग शेंगा फोडणी यंत्राचा उपयोग केला असता शेंगा तोडण्याचा व शेंगा फोडण्याचा वेग वाढतो तसेच वेळ, श्रम व पैसा वाचतो.<br>काढणी केलेल्या शेंगा वाळवून त्यातील ओलावा १० टक्क्यांपर्यंत कमी करावा. यामुळे शेंगा साठवणुकीमध्ये सुरक्षित राहतात. उन्हात शेंगा वाळविणे ही चांगली व सोपी पद्धत आहे. शेंगामध्ये बुरशी वाढू नये, म्हणून शेंगा लवकर वाळवाव्यात. |

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| **द्राक्षे** | | द्राक्ष बागेत धूर किंवा बागेला गोणपाट किंवा साडीने किंवा शेड नेट बांधून थंडी पासून संरक्षणकरावे.<br>थंडीपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी संध्याकाळच्या वेळी हलके व वारंवार / तुषार सिंचन च्या सहाय्याने पाणी द्यावे.<br><u>लवकर छाटणी झालेल्या बागेतील व्यवस्थापन</u><br>या बागेत सध्या प्री ब्लूम अवस्थेत द्राक्ष घड दिसून येतील. प्री ब्लूम अवस्थेतील पोपटी रंग आलेल्या घडास १० पीपीएम जीए ३ ची फवारणी फायद्याची राहील. द्रावणाचे चांगले परिणाम मिळण्यासाठी वापरात येणाऱ्या पाण्याचा सामू ६.५ ते ७ असावा. तर द्रावणाचा सामू हा ५.५ ते ६ इतका असावा. असे नियोजन केल्यास दोन पाकळ्यांतील अंतर व पाकळीची लांबी वाढण्यास मदत होईल. हा सामू मिळण्यासाठी द्रावणामध्ये युरिया फॉस्फेट किंवा सायट्रिक ॲसिड वापरता येईल. यावेळी जीएचे विशेष कार्य म्हणजे पेशींची संख्या व आकार वाढवणे होय. जीएची दुसरी फवारणी करायची झाल्यास १५ पीपीएम जीए पहिल्या फवारणीच्या पाच दिवसांनंतर करावी. फवारणीचे चांगले परिणाम मिळण्यामध्ये तापमान आणि आर्द्रता यांची भूमिका महत्त्वाची असते. सायंकाळी चार वाजल्यानंतर फवारणी केल्यास आर्द्रता योग्य असल्यामुळे जीएचे शोषण करण्याची पानांची क्षमता वाढते. जीएची फवारणी करण्याआधी एक दिवस आधी झिंक आणि बोरॉन प्रत्येकी अर्धा ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे फवारणी केल्यास पानांची जीए शोषण्याची क्षमता वाढते. या वेळी वातावरण कोरडे असल्यामुळे रोग व कीड नियंत्रणासाठी उपलब्ध असलेले बुरशीनाशक व कीडनाशक संजीवकासोबत मिसळणे टाळावे. |
| **डाळिंब** | | डाळिंब बागेत धूर किंवा बागेला गोणपाट किंवा साडीने किंवा शेड नेट बांधून थंडी पासून संरक्षणकरावे.<br>थंडीपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी संध्याकाळच्या वेळी हलके व वारंवार / तुषार सिंचन च्या सहाय्याने पाणी द्यावे.<br><u>सिंचन</u><br>सिंचनासाठी ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करावा. झाडाजवळचे २० टक्के क्षेत्र ओलिताखाली येणे गरजेचे असते. त्यापेक्षा अधिक क्षेत्र ओलिताखाली आल्यास, बागेत सूक्ष्म वातावरण तयार होऊन खोडांना लहान छिद्रे पाडणारे भुंगेरे व मर रोग यांचा प्रादुर्भाव वाढतो. खोडकिडीचा जास्त प्रादुर्भाव असलेल्या ठिकाणी डाळिंबाला हलक्या जमिनीत चार खोडे ठेवून वळण देणे योग्य ठरते. |
| **आंबा** | | <u>हंगामपूर्व व्यवस्थापन</u><br>आंबा बागेतील गवत काढून बागेची साफसफाईची कामे करावीत, जेणेकरून बागेतील जमिनीमध्ये असलेला ओलावा लवकर कमी झाल्याने मोहोर येण्याची प्रक्रिया सुरु होण्यासाठी झाडाच्या मुळांना आवश्यक असलेला ताण बसण्यास मदत होईल. बागेची साफसफाई करताना बागेतील सुकलेल्या, निर्जीव आणि रोगग्रस्त फांद्या काळजीपूर्वक काढून टाकाव्यात.<br>आंब्याच्या झाडांवर नियमित मोहोर येण्यासाठी ‘बेसिन एक्सपोजर’ ही प्रक्रिया करावी. यासाठी आंबा झाडाच्या बुंध्यालगतची जमीन झाडाच्या बुंध्यापासून सुमारे १.५० मीटर अंतरापर्यंत आणि १५ ते २० सें.मी. खोलीपर्यंत उकरावी. झाडाच्या बुंध्यालगतची जमीन पॉवर टिलर किंवा कुदळ यांच्या सहाय्याने उकरू शकतो. बेसिन एक्सपोजरमुळे जमिनीतील ओलावा लवकर कमी होण्यास मदत होते, ज्यामुळे झाडावर मोहोर येण्यासाठी आवश्यक असलेला ताण निर्माण होतो. |
| **कांदा** | | <u>खरीप कांदा काढणी</u><br>खरिपाच्या कांदा पिकाची काढणी वेगवेगळ्या जातींनुसार पुनर्लागवडीनंतर १०० ते ११० दिवसांनी करावी. खरिपात कांदा तयार झाला तरी माना पडतीलच असे नाही. अशावेळी पीक काढणीच्या दोन किंवा तीन दिवस आधी रिकामा बॅरल फिरवून कृत्रिमरीत्या माना पाडाव्या लागतात. शेत कोरडे असताना पीक काढणी करावी. कांदा काढल्यानंतर तो शेतामध्ये पातीसह तीन-चार दिवस सुकण्यास पडू द्यावा. प्रत्येक वाफ्यातील कांदा अशारीतीने ठेवावा की, दुसरी ओळ पहिल्या ओळीचा फक्त कांदा झाकेल आणि पात उघडी राहील. तीन-चार दिवसात कांद्याची पात पूर्णपणे सुकते. कांद्याची पूर्ण सुकलेली पात २ ते २.५ सें.मी. लांब मान ठेऊन कापावी. नंतर जोडकांदे, डेंगळे आलेले कांदे आणि चिंगळी कांदे काढून टाकावे. राहिलेले चांगले कांदे गोळा करून सावलीत १०-१२ दिवस ठेवावे. |
| **टोमॅटो** | | <u>रोपवाटीकेतील करपा व रसशोषक कीड नियंत्रण</u><br>टेब्युकोनॅझोल (२९.५ ईसी) १ मिली अधिक फिप्रोनील (५ एससी) १.५ मिली किंवा थायमेथोक्झाम (२५ डब्लूजी) ०.४ ग्रॅम किंवा कार्बोसल्फॉन (२५ ईसी) १ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणे बियाणे उगवल्यानंतर १० दिवसांच्या अंतराने आलटून पालटून दोन ते तीनवेळा फवारणी करावी. |

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| **पशुधन (गाय, म्हैस)** | | जनावराना रात्री गोठ्यात ठेवावे आणि थंडीपासून बचाव करण्यासाठी गोठा कोरडा ठेवावा. लहान करडे/ कोकरे/ वासरे यांचे सध्याच्या थंडीपासून संरक्षण करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर व्यायला आलेले जनावरांचीही काळजी घेणे गरजेचे आहे. त्यासाठी जनावरांच्या गोठ्यांना बारदान / शेडनेटचे पडदे लावावेत. तसेच गोठ्यामधील उष्णता टिकून राहण्यासाठी ५०० ते १००० व्हॅटचे बल्ब गोठ्यामध्ये कमी उंचीवर लावावीत. शक्य झाल्यास गोठ्यामध्ये शेकोटी पेटवावी. गाभण जनावरांना व छोटय़ा जनावरांना रात्रीच्या वेळी वाळलेले गवत/ कडबा/ गोणपाट यांची बिछायत टाकावी. गोठा कोरडा राहील याची कटाक्षाने काळजी घ्यावी. त्यासाठी दर ८ ते १० दिवसांनी गोठ्यामध्ये चुना भुरभुरावा. थंडीचे प्रमाण जास्त वाढल्यास जनावरांच्या अंगावर गोणपाट बांधावे. विशेषत: गाभण गायी-म्हशींची जास्त काळजी घ्यावी. जनावरांना जास्तीत जास्त ऊर्जा मिळण्यासाठी जनावरांच्या आहारात शेंगदाणा पेंड/ सरळी पेंड यांचा वापर वाढवावा. शक्य असल्यास बायपास पेंड/ सरळी पेंड यांचा वापर वाढवावा. शक्य असल्यास बायपास फॅट व प्रथिनयुक्त आहार द्यावा. क्षार व जीवनसत्त्वांचे मिश्रण वाढवावे. सकाळच्या वेळी हिरवा चारा व रात्रीच्या वेळी वाळलेला चारा द्यावा. चराऊ जनावरांना चरण्यासाठी नेताना सकाळी उशिरा न्यावे, जेणेकरून गवतावर दहिवर नसेल. गोगलगाईचा प्रादुर्भाव असलेल्या ठिकाणी जनावरे चरावयास नेऊ नयेत. |
| **शेळी** | | <u>नोव्हेंबर व डिसेंबरमधील शेळ्यांतील व्यवस्थापन</u><br>पैदाशीचे बोकड शेळ्यांपासून वेगळे ठेवावेत.<br>विणाऱ्या शेळ्यांसाठी गोठ्यात स्वतंत्र व्यवस्था करावी.<br>गाभण जनावरांचा आहार व आरोग्यावर लक्ष ठेवावे. |
| **मेंढी** | | <u>नोव्हेंबरमधील मेंढ्यांतील व्यवस्थापन</u><br>थंड हवेपासून कळपाचे संरक्षण करावे.<br>नवजात कोकरांना व मेंढ्यांचे थंडीपासून संरक्षण करावे.<br>कोकरांचे शारीरिक वजन घेऊन नोंदी ठेवाव्यात.<br>गाभण मेंढ्या व मेंढेनरांना ४०० ग्रॅम पशुखाद्य खाऊ घालावे. |
| **कुक्कुटपालन** | **व्यवस्थापन** | <u>अंडी देणाऱ्या कोंबड्यांसाठी चोची कापणे व रोग प्रतिबंधक लस टोचणी कार्यक्रम</u> |

| पक्षाचे वय | प्रतिबंधक लस | लस टोचण्याची पद्धत |
|---|---|---|
| १ दिवस | मॅरेक्स | पायाच्या स्नायुमध्ये (उबवणी केंद्रामध्ये) |
| ५ ते ७ दिवस | लासोटा (एफ.वन) | नाकातून अथवा डोळ्यातून १ थेंब |
| ७ दिवसानंतर | चोची कापणे | आधी वरची व खालच्या चोचीचा शेंडा कापणे |
| ७ ते १४ दिवस | गंबोरो | डोळ्यातून देणे |
| ४ था आठवडा | इनफेक्ट्सिस ब्राँकायटिस | डोळ्यात एक थेंब टाकणे |
| ५ वा आठवडा | लासोटा | पिण्याच्या पाण्यातून देणे |
| ८ वा आठवडा | देवीची लस | पायाच्या मांसल भागात |
| १० वा आठवडा | रानीखेत लस (आर.बी.) | पायाच्या मांसल भागात |
| १० ते १२ आठवडे | चोची कापणे | वाढलेल्या चोची कापणे व तो भाग वाढू देऊ नये |
| १८ वा आठवडा | रानीखेत लस (लासोटा) | पाण्यातून देणे |

<u>सूचना</u> : वरील प्रतिबंधक लस टोचल्यानंतर ३ दिवस व्हिटॅमिन मिश्रण पाण्यातून अगर खाद्यातून द्यावे. त्यामुळे कोंबड्यांना लस टोचण्याचा ताण कमी होईल व कोंबड्या नेहमीप्रमाणे राहतील. सरासरी २ ते ३ महिन्यानंतर एकदा जंताचे औषध पाजावे.

**स्त्रोत:**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : ग्रामीण कृषि मौसम विभाग वेधशाळा विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

**स्वाक्षरीत/-**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, इगतपुरी**
**तथा सहयोगी संशोधन संचालक,**
**वि.कृ.सं.के., इगतपुरी, जि. नाशिक**

**ठिकाण** : विकृसंके, इगतपुरी
**दिनांक** : १४. ११. २०२५